## महसूल व वन विभाग.

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जुलै २०११

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. १९६ (२)/म-१.—उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्रमांक पीएसआय. १७०७ (सीआर ५०)/उद्योग-८, दिनांक ३० जून २०११ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ मध्ये सुधारणा करून सदर योजनेला दिनांक ३१ ऑगस्ट २०११ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

त्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या पोट-कलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून तसे करणे आवश्यक आहे, अशी खात्री झाल्याने महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन आदेश क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. १९६ (२)/म-१, दिनांक १२ जून २००७ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ (यामुळे त्याचा निर्देश उक्त आदेश करण्यात आला आहे) मुद्रांक शुल्कात दिलेल्या सवलतीची मुदत दिनांक १ जुलै २०११ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०११ या कालावधीपर्यंत वाढविण्यात येत आहे. त्याकरिता उक्त आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

उक्त आदेशात परि. १ मध्ये " ३० जून २०११ रोजी संपणाऱ्या " या ऐवजी " ३१ ऑगस्ट २०११ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश ज. नार्वेकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th July 2011

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

So. Mudrank. 2007/C.R. 196 (2)/M-1.--Whereas, Government of Maharashtra, Industries, Energy and Labour Department is extend Package Scheme of Incentives, 2007 from 1st July 2011 to 31st August 2011 *vide* Government Resolution Industries, Energy and Labour Department No. PSI. 1707/(C.R. 50)/ Jnd-8, dated 30th June 2011.

Wow, therefore, in exercise of the power's conferred by clause *(a)*of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958) lhe Government of Maharashlra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby extends the period exemption of Stamp Duty from 1st July 2011 to 31st August 2011 under lhe said scheme and for thal purpose, amends tho order Revenue and Forest Department No. Mudrank. 2007/C.R. 1.96(2)/M-1, dated 12th June 2007 (hereinafter refered as the said order) as follows ;

In the said order in paragraph one for the works, figures, and letters " ending on the 30th June 2011 ", the words, figures and letters " ending on the 31st August 2011 " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH J. NARVEKAR,
Deputy Secretary to Government.